गोदातीर दि. 6.9.25



# डीजेमुक्त श्रीगणेशोत्सव साजरा करणाऱ्या ५८ गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांचा पोलीस अधीक्षकांकडून सत्कार



**नांदेड/ शंकरनगर (प्रतिनिधी)-** जिल्ह्यात साजरा होणाऱ्या श्री गणेशोत्सव अनुषंगाने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनअंतर्गत शांतता कमिटीच्यावतीने बैठका घेण्यात आल्या. त्यात डीजेमुक्त श्री गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. अशा डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करणाऱ्या ५८ गणेश मंडळांचा पोलीस अधीक्षकांकडून सत्कार करण्यात आला.

पोलीस अधीक्षक यांनी साजरा होणारा श्री गणेशोत्सव डीजेमुक्त वातावरणात साजरा करण्यासाठी केलेल्या आवाहनाच्या अनुषंगाने गणेश मंडळांनी सकारात्मक प्रतिसाद देत उस्मानगनर ठाण्याच्या हद्दीतील ३८ व रामतीर्थ हद्दीतील २० गणेश मंडळाच्या पदाधिकारी यांनी पुढाकार घेवून यंदाची गणेशोत्सव मिरवणुक डीजेमुक्त वातावरणात काढण्याचा संकल्प करून पारंपारिक ढोल वाद्य, झांज पथक, भजनी मंडळी यांच्या वापरास प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे.

विशेष बाब म्हणजे उस्माननगर हद्दीतील सुगाव या गावातील यशवंत गणेश मंडळाने स्थापन केलेल्या गणेश मुर्तीसाठी लागणाऱ्या लाल मातीचा मान मुस्लीम समाजातील हबीब मौलासाहब शेख, रा. सुगाव यांना देण्यात आला आहे. तसेच रामतीर्थ हद्दीतील केरूर गावातील नवयुवक गणेश मंडळाचे अध्यक्ष मुस्लीम समाजाचे शादुल बाबुसाहब शेख, रा. केरूर हे आहेत. सदरचे उपक्रम राबवून गणेश मंडळातील पदाधिकारी यांनी समाजात सर्वधर्म समभाव हा संदेश पोहचवला आहे.

न्यायालयाच्या सुचनेनुसार आणि डीजे मुक्त गणेश उत्सव साजरा करण्याचे प्रशासनाने चांगले नियोजन केले आहे. जिल्ह्यात सण उत्सव काळात शांतता राखून उत्तम नियोजन केले जाते. सण उत्सव काळात डीजेचा वापर न करता पर्यावरणपूरक उत्सव साजरे करून चांगला आदर्श निर्माण करता येतो. उत्सव काळात गणेश मंडळांनी दिलेल्या सुचनेचे योग्य पालन करावे, वेळेचे बंधन पाळावे, सर्व धर्माचा आदर करून डीजेमुक्त गणेश उत्सव शांततापुर्वक साजरा करावा असे अबिनाश कुमार यांनी आवाहन केले आहे.